# अभिरुची

## मराठी मंडळ सॅक्रामेंटो

# दिवाळी अंक २०२५

## या अंकात...


**संपादकीय** २

**मराठी मंडळ सॅक्रामेंटो मुख्य कार्यकारिणी २०२५** ४

**अध्यक्षीय** ५

**कथाकथी**

बाबाला जाणशील? ८

**ललित लेखन**

गोष्ट एका कपाटाची ११
शोध “अनुरूप”जोडीदाराचा १४
एक तरी ओवी अनुभवावी १९
बुद्धं शरणं गच्छामि २५
हवा “हवाई” २६
“पत्रापत्री”च्या निमित्ताने ३२

**मागील कार्यक्रमांची क्षणचित्रे** ३६

**काव्यांजली**

पायाचे महत्त्व ४७
मनुताई ४८
अपेक्षा ४९

**MMsac Youth Awards** ५२

**काहीतरी शिजतंय**

विविध प्रकारच्या पुऱ्या ६०

**मराठी शाळा** ६८

**MMSAC YOUTH OUTREACH PROGRAM** ७२

# संपादकीय

नमस्कार मंडळी,

२०२५ सालचा **‘अभिरुची’**चा खास वार्षिक अंक/दिवाळी अंक आपल्याहाती सोपवताना मला अतिशय आनंद होत आहे.  अंक प्रकाशित करण्यात विलंब झाल्याबद्दल सर्वप्रथम मी दिलगिरी व्यक्त करते आणि त्याबद्दल क्षमस्व.

यावेळचा हा अंक तसा अगदीच छोटेखानी आहे. परंतु तुम्हा सर्वांना तो नक्कीच आवडेल याची मला खात्री आहे.

**‘अभिरुची’**चा उद्देश खरंतर आपल्यातील अनेक गुणी लेखक, कवी, साहित्यप्रेमी, छायाचित्रकार, कलाकार,चित्रकार, विचारवंत,त्याचप्रमाणे मुलांच्या कलाकृती  या सगळ्यांना एक व्यासपीठ मिळावे असा आहे. या सगळ्यांनी योगदान दिले तरच अभिरुचीची परंपरा आपण पुढे नेत राहू शकू. पण सांगताना खेद वाटतो की  यावर्षी याबाबतीत थोडा निरुत्साह जाणवला व अतिशय अल्प प्रतिसाद मिळाला. प्रतिसादाच्या अपेक्षेत असल्याने देखील प्रकाशनासाठी विलंब झाला. AI, Social Media च्या विळख्यात आपण अडकत चाललोय म्हणून तर आपण अश्या व्यासपीठापासून लांब होत चाललोय की काय ही नक्कीच आपण सगळ्यांनीच विचार करण्यासारखी बाब आहे. तेव्हा  तुम्हा सर्वांकडून पुढच्या वर्षी अंकाला भरभरून लिखाण मिळेल असा मला विश्वास आहे.

मंडळी , अंक जरी आकाराने लहान असला तरी अतिशय उत्तम आणि दर्जेदार साहित्याने परिपूर्ण आहे. आणि वैविध्याने नटलेला आहे. कथा, ललितलेखन, प्रवास वर्णन, अध्यात्मिक लेख,  खुमासदार लेख,  अनोख्या पाककृती असे विविध विषय या अंकात तुम्हाला वाचायला  मिळतील.

ज्यांच्या योगदानामुळे हा अंक तयार होऊ शकला त्या सर्व कवी, लेखक आणि ज्यांनी ज्यांनी हातभार लावला त्या सर्वांना मन:पूर्वक  धन्यवाद! त्याचप्रमाणे मला विशेष उल्लेख करावासा वाटतोय तो  आपल्या मंडळातील युवा सदस्या हृतिका देशपांडे हिचा! अंकाचे अतिशय सुंदर,समर्पक आणि लक्षवेधी मुखपृष्ठ तयार केल्याबद्दल तिचे मन:पूर्वक आभार!

हा अंक तुम्हाला कसा वाटला हे आमच्यापर्यंत नक्की पोचवा. अनावधानाने अंकात काही त्रुटी राहून गेल्या असल्यास क्षमस्व. आपल्या अभिप्रायांचे, सूचनांचे तसेच बहुमोल सल्ल्याचे नक्कीच स्वागत आहे.
अंकासंबंधित संपर्क करायचा असल्यास इमेल पत्ता खालील प्रमाणे :
मीनल जोशी - meenaljo29@gmail.com
मराठी मंडळ सॅक्रामेंटो - mmsac.committee@gmail.com

कळावे.
लोभ असावा.

आपली स्नेहांकित
मीनल जोशी
संपादक , अभिरुची
मराठी मंडळ सॅक्रामेंटो २०२५



# मराठी मंडळ सॅक्रामेंटो मुख्य कार्यकारिणी २०२५






संदेश मालपुरे
अध्यक्ष

स्वप्नील चळेकर
सचिव

दीपिका रणदिवे
खजिनदार

अभिजीत जोशी
उप सचिव

## इतर कार्यकारिणी

बीएमएम समन्वयक: अजित नातू
आय ए एस समन्वयक: विनायक पाटील
अभिरुची संपादक: मीनल जोशी
लेखापरीक्षक : मृदुला चोरडिया

## मराठी शाळा सॅक्रामेंटो कार्यकारिणी

समन्वयक: मनीषा पाटील, यतिन कोरडे,
पल्लवी सावंत, सुखदा मंगरूळकर

खजिनदार: अमोल जोशी

# अध्यक्षीय

प्रिय मित्रांनो,
नमस्कार!
मराठी मंडळ सॅक्रामेंटो (MMSac) तर्फे आपले मनःपूर्वक स्वागत करताना मला अत्यंत आनंद आणि अभिमान वाटतो. काही मराठी कुटुंबांनी मिळून सुरू केलेला हा प्रवास आज एका उत्साही आणि रंगतदार समुदायात रूपांतरित झाला आहे — जो आपली भाषा, संस्कृती आणि परंपरा जपत आहे.
आमचे ध्येय साधे आहे, पण अत्यंत अर्थपूर्ण — महाराष्ट्रीय संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करणे तसेच सॅक्रामेंटो परिसरातील मराठी बांधवांमध्ये मैत्रीचे बंध अधिक मजबूत करणे. वर्षभर आपण होळी, गुढीपाडवा, गणेशोत्सव, कोजागिरी, दिवाळी आणि संक्रांत असे अनेक सण एकत्र साजरे करतो. प्रत्येक कार्यक्रम आपल्या समुदायातील आपुलकी आणि आपल्या मुळांबद्दलचा अभिमान दर्शवतो.

## मराठी शाळा, साहित्य आणि समाजकार्य

फक्त सांस्कृतिक कार्यक्रमच नव्हे तर MMSac हे शिक्षण, सर्जनशीलता आणि समाजसेवेचे व्यासपीठ देखील आहे.
आमची **मराठी शाळा** मुलांमध्ये भाषेची ओळख आणि अभिमान निर्माण करते; **साहित्य आणि अभिरुची उपक्रम** कलात्मक आणि साहित्यिक प्रतिभेला वाव देतात; आणि **सामाजिक व स्वयंसेवी उपक्रम** कुटुंबांना अर्थपूर्ण पद्धतीने एकत्र आणतात.

---

## आमचे ज्येष्ठ मराठी बांधव — सन्मान आणि कृतज्ञता

या वर्षातील एक विशेष उपक्रम म्हणजे आपल्या आदरणीय मराठी ज्येष्ठ नागरिकांचा (वय ७५+) सन्मान.
त्यांच्या आयुष्यभराच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या वयोगटातील सर्वांसाठी प्रवेश मोफत ठेवण्यात आला. सर्व सदस्यांनी आपल्या ज्येष्ठांना नोंदणीसाठी आणि कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी मदत करावी, ही विनंती.
त्यांचा सन्मान म्हणजे आपण सर्वांना प्रेरणा देणाऱ्या संस्कारांचा आणि सांस्कृतिक वारशाचा गौरव.

---

## MMSAC पुरस्कार २०२५ — तरुणांच्या यशाचा उत्सव

या वर्षी मी एका नवीन उपक्रमाचा शुभारंभ केला — **MMSAC Awards Program 2025** — आपल्या तरुण पिढीतील उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यासाठी.
MMSac ***ने हायस्कूल विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी $200 चे चार पुरस्कार आणि मिडल स्कूल विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी $100 चे चार पुरस्कार खालील प्रकारात दिले:***

1 ***शैक्षणिक उत्कृष्टता (Academic Excellence)***

2 ***एक्सप्लोरर पुरस्कार (Explorer Award)***

3 ***सोशल लीडर पुरस्कार (Social Leader Award)***

4 ***कला आणि सर्जनशीलता पुरस्कार (Arts & Creativity Award)***

हा कार्यक्रम तरुण पिढीला नेतृत्व, सर्जनशीलता आणि समाजसेवेची प्रेरणा देण्यासाठी रचला आहे — कारण हीच पिढी आपल्या मराठी समुदायाचे भविष्य आहे.

---

## निरोगी जीवनशैली आणि एकत्रतेचा उत्सव — MMSAC कॅम्पिंग २०२५

आरोग्य, आनंद आणि एकत्र वेळ घालवण्याचा उद्देश साध्य करण्यासाठी **MMSac Camping Event** (१९–२१ सप्टेंबर २०२५) मॅन्झनिटा लेक, लॅसन वॉल्कॅनिक नॅशनल पार्क येथे आयोजित करण्यात आला.
हायकिंग, तारांकित आकाश निरीक्षण, निसर्गभ्रमंती, गरम झरे आणि कॅम्पफायर — या सगळ्यांनी हा अनुभव साहस आणि विश्रांतीचा सुंदर संगम ठरला.
या प्रवासाने आपल्याला निसर्गाच्या जवळ नेले आणि आरोग्य व मैत्री हे हातात हात घालून चालतात, हे पुन्हा जाणवले.

---

आगामी काळात, प्रत्येक स्वयंसेवक, प्रायोजक आणि सदस्याचे मनःपूर्वक आभार मानतो.
चला, संस्कृती, करुणा आणि समुदायभाव यांचा उत्सव साजरा करत, अभिमानाने पुढे पाऊल टाकू या!

**मराठी पाऊल पडते पुढे!**


**आपला**
**संदेश मालपुरे**



# कथाकथी



# बाबाला जाणशील?



दुसऱ्या शहराला भेट द्यायला गेलेल्या एका तरुण मुलाने, आई बापाला अभिमानाने फोन केला व विडिओवर शहर उत्साहाने दाखवायला लागला.

आई लगेच त्याला म्हणाली, "अरे वा, किती छान, तु तर मस्त दिसतो आहेस आणि पाठीमागे किती सुंदर रस्ते, बिल्डिंगी! वा, मजा कर बेटा".

मुलगा खूप खुश झाला व पुढे सांगायला लागला व म्हणाला "आई, माझे बाबा कोठे आहेत, त्यांनापण दाखवतो हे मस्त शहर फोन विडिओवर!";

आईने बापाला फोन हाती दिला, फोनमधील सेल्फीचा उपयोग करीत, मुलगा शहर दाखवत, बाबाला म्हणाला "बाबा कसे छान आहे ना इथे!".

बाबा म्हणतो, "अरे पण तू भर गर्दीत मास्क लावला दिसत नाहीयेस! प्रथम मास्क लाव बघू!"....

मुलगा व त्याची आई बाबाला बोलली, "काही कळत नाही  तुम्हाला, कौतुक साधे नाही मुलाचे, इतके उत्साहाने स्वतःहून सांगतो आहे"!

......... ते वरील मास्कबद्दलचे बाबाचे शब्द तसेच विरले  ....   त्यावरील मुलाची, आईची प्रतिक्रिया ऐकून तो बाप गप्प बसला, नेहेमीप्रमाणे.

बाप मनातच  म्हणाला, "अरे बाळा, कसे सांगू तुला. काळजी जिभेवर प्रथम आली".
अरे, बाप 'उद्याचे' बघतो, आई 'आत्ताचे' पहाते!

(कोव्हिड काळात सुचून गेलेली एक लघुकथा)

अजित नातू



# ललित लेखन



# गोष्ट एका कपाटाची !



ही गोष्ट आहे एका १०० वर्षांपूर्वीच्या कपाटाची! आमचा पुण्यात प्रभात रोड ला बंगला होता अभिरुचि नावाचा!
२ वर्षापुर्वी ती वास्तू आम्ही जेंव्हा सोडली तेंव्हा मुलांना विचारले कि तुम्हाला त्या घरातले काही हवे आहे का? मुग्धा , माझी मुलगी म्हणाली कि हो , मला ते आज्जी आजोबांचे कपाट आवडेल इथे अमेरिकेत माझ्या घरी पाहायला !

त्या कपाटाला तर मोठा इतिहास आहे !

ते कपाट हर्ष बर्वे ( माझे यजमान) यांच्या आजोबांनी घेतले होते. प्रचंड मोठे , मजबूत लाकडाचे आणि मोठ्ठा आरसा असलेल्या त्या कपाटाला एक चोर कप्पा होता .हर्ष सांगतात की त्यांची आज्जी त्या कपाटात चांदीची भांडी ठेवायची ! अभिरुचि बंगला बांधायच्या आधी जे जुने घर होते तेंव्हापासून ते कपाट तिथे दिमाखात उभे होते. आणि पानशेत च्या पुरात ते कपाट पुराच्या चिखलात वरपर्यंत बुडाले होते कारण जुन्या घराचा सम्पूर्ण एक मजला पाण्याखाली गेला होता . पण तरीही एक ही ओरखडा नाही, की लाकूड पूर्णपणे भिजून यकिंचितही फुगले नाही ! आणि तो आरसा ही तसाच राहिला.आणि मागे वळून पाहता आता मला वाटते की त्या कपाटाला जणू माहित होते की ते अजून खूप पिढ्या राहणार आहे !

आता आम्ही ठरवले की ते कपाट अमेरिकेत फॉल्सम ,कॅलिफोर्नियात पाठवायचेच ! मग आठवले की Pusalkar and Co या प्रसिद्ध Clearing agency च्या श्री विनायक दीक्षित यांचा आणि हर्षुचा , चांगला परिचय होता. श्री. विनायक यांनी आम्हाला ओळखले आणि आमचा कपाट पाठवायचा हेतू ऐकून तर त्यांनी अगदी आनंदानी आणि मनापासून आम्हाला मदत केली

प्रथम त्यांनी महत्वाची खबरदारी घेतली ती ही की ते कपाट चुकूनही "हेरिटेज " कपाट म्हटले जाऊ नये. भारतात आपण सर्रास १०० वर्ष्यापुर्वीची गोष्ट वापरतो पण अमेरिकेत clearing ला प्रॉब्लेम नको यायला ! मग पॅकिंग सुरु झाले. ते आरसा असलेले कपाट बोटीनी पाठवायचे त्यामुळे त्याच्या चारी बाजूंनीं मोठी लाकडाची जणू box च तयार केली!

नंतर श्री विनायक यांच्या मदतीने ते कपाट सुखरूप अमेरिकेत मुग्धाच्या घरी पोचले. आश्यर्य म्हणजे तिच्या घरात दोन खिडक्यांच्या मध्ये ते अगदी बरोब्बर मावले , जणू काही त्याची तीच जागा होती . दुसरे आश्यर्य म्हणजे मुग्धा दुसर्या दिवशी मला फोन करून सांगते कि तिला त्या कपाटाचा दाराशेजारी आज्जीची टिकली चिटकवलेली दिसली ! ती नक्की त्यांचीच टिकली आहे कारण त्या मोठी टिकली लावायच्या आणि मी नेहेमीच लहान टिकली लावायचे ! मुग्धा ला त्या कपाटाशी निगडित तिच्या आज्जीच्या ( माझ्या सासूबाईंच्या) खूप आठवणी होत्या . जणू त्या तिला वरून आशीर्वादच देत आहेत .



तुम्हाला म्हणून सांगते की ते कपाट पाठवायला साधारण लाख रुपये लागले पण ते कपाट त्या लाखमोलाहूनही अधिक किमतीचे आहे किम्बहुना अनमोलच आहे ! मुग्धा परवा सांगत होती की तिच्या कडे कोणी आले की ते कपाट पुढच्याच खोलीत असल्यामुळे ,ती सगळ्या पाहुण्यांना ह्या कपाटाची गोष्ट सांगते आणि आज्जीच्या आठवणींना उजाळा देते . आम्हा दोघांना तर इतके समाधान मिळाले आहे की शब्दात सांगूच शकत नाही . च्या घरातले

१०० वर्ष्यांहूनही आधीचे ते कपाट,  ह्यांच्या आणि त्यांच्या बहिणींच्या बालपणीच्या मज्जा बघून, नंतर आमच्या मुलांच्या  बालपणीच्या मज्जा बघून, आता  मुग्धाच्या घरात  तिच्या मुलांना बागडताना बघत मज्जेत अमेरिकेत राहत आहे !

माणसांप्रमाणे प्रेमाच्या वस्तूंचे पण ग्रह, तारे असले पाहिजेत त्यामुळे कपाट ही सुस्थळी विराजमान झाले आहे ,
आणि त्याच्या आमच्याशी  असलेल्या ऋणानुबंधाच्या गाठी जास्तच पक्क्या झाल्या आहेत!

सौ. मोहिनी बर्वे



.


sanskrit
new age indian
2776 E. Bidwell St #300, Folsom, CA
916-817-4356 | sanskritindian.com

# शोध “अनुरूप” जोडीदाराचा!



३ वर्षांपूर्वीची गोष्ट! नेहमीच्या वेळी आईचा व्हिडीओ कॉल आला आणि आई एकदम उत्साहात म्हणाली, "सौरभ तुझ्यासाठी एक स्थळ आलं आहे". "इतक्या लवकर लग्न वगैरे नाही हा", असं म्हणून मी 'टिपिकल' २७ वर्षीय तरुणाप्रमाणे तो विषय टाळला. MS झाल्यानंतर नुकतीच नोकरी लागली होती. नवीन ठिकाणी जाण्यासाठी मी रूममेट शोधत होतो आणि आईचं मात्र वेगळंच सुरु होतं. १-२ आठवडे आमच्या व्हिडीओ कॉल्सचा तोच 'हॉट टॉपिक' झाला...Arranged marriage म्हटलं की 'टिपिकल' कांदे पोहे आणि ठरलेले प्रश्न होतात, मला हे करायचं नव्हतं....आधी त्रास दिला पण नुसता ओळख परिचय करून घ्यायला काय हरकत आहे, असा विचार करून मी 'तिच्याशी' बोलायला तयार झालो. 'स्थळ' म्हणलं की थोडं टेन्शनच आलं. थोडा गोंधळ उडाला...कदाचित एखाद्या अचानक आलेल्या 'इंटरव्ह्यू कॉल' पेक्षा जास्त!... पण या आयुष्याच्या सगळ्यात महत्वाच्या 'इंटरव्ह्यू'साठी पण तयारी करावी लागणार असल्याची जाणीव झाली. खरंच किती महत्वाचा निर्णय आहे हा! कारण हा निर्णय सहज 'न बदलता' येणारा आहे. नोकरी मनासारखी नसेल तर ती प्रयत्न करून बदलता येते. रूममेटशी पटत नसेल तरी देखील त्यात बदल शक्य आहे. पण जोडीदाराबाबत असं होत नाही. हा ब्लॉग माझ्या या शोधाबद्दल...हा निर्णय घेताना मी केलेला विचार, घरच्यांशी आणि मित्रवर्गाशी केलेली चर्चा, त्या 'पहिल्या' भेटीची तयारी, या सगळ्या प्रवासाबद्दलचे अनुभव कथन...

करोनामुळे माझे सगळे इंटरव्ह्यू ऑनलाईन झाले होते. त्याचप्रमाणे माझी ही भेट देखील....पहिल्यांदा 'तिच्याशी' झालेल्या भेटीनंतर मला लक्षात आलं की आपली या परीक्षेची काहीच तयारी झालेली नाहीये. म्हणजे मला नक्की कसा जोडीदार हवा आहे, याचा मी इतका गांभीर्याने विचार केलाच नव्हता. किंबहुना "अनुरूप" अशा जोडीदाराची माझ्या मनात प्रतिमा तयारच नव्हती. जोडीदार कसा

असायला हवा, याचा विचार मनात सुरु झाला. याविषयी आईशी, जिवलग मित्रवर्गाशी गप्पा मारल्या. मग जाणवलं की हा विचार करण्याआधी 'स्वतःचा' अभ्यास करायला हवा. इतकं काही हे गणित सोडवल्यासारखं क्लिष्ट नाही. पण जोडीदार अगदीच आपल्यासारखा असेल तर सुरुवातीला मस्त वाटेल पण काही काळानंतर काही वेगळेपणा उरणार नाही. जे गुण माझ्यात नाहीत, ते 'तिच्या'मध्ये असेल तर ते जास्त "अनुरूप" होईल, असं वाटलं. पण सगळ्याच गोष्टीत असं असून चालणार नाही, हे देखील वाटलं. माझ्यासाठीच्या "Uncompromising" गोष्टी कुठल्या याचा विचार केला आणि त्यावर 'तिचं' मत गप्पा मारता मारता जाणून घायचं ठरवलं.

"नुसतं दोन-तीनदा भेटून आयुष्यातला इतका महत्वाचा निर्णय कसा घ्यायचा?", असं अनेकजण म्हणतात. निर्णय घ्यायला वेळ घेतला तर अनेक आई-वडील वैतागून म्हणतात- "आमच्यावेळी इतकं स्वात्रंत्र्य नव्हतं बाबा!" पण घरच्यांनी या पूर्ण प्रक्रियेत आम्हाला खूप मोकळीक दिली. मला वाटतं आधीच्या पिढीमध्ये संयम तर होताच पण त्यांच्या 'अपेक्षा' देखील कमी होत्या. हल्ली जास्त भर हे नातं "परफेक्ट" करण्याकडे नसून "परफेक्ट" जोडीदार शोधण्याकडे आहे, असं मला वाटतं. म्हणूनच मी या शोधात प्रसंगी समोरच्या व्यक्तीचं जास्त ऐकून 'माणूस' समजून घ्यायचा प्रयत्न करण्याचं ठरवलं!...

एकमेकांना समजून घेता यावं यासाठी आम्ही दोन दिवसीय ट्रीपचं नियोजन केलं. (खरंतर आमच्या पालकांची कल्पना होती!) त्या ट्रीपनंतर मला समजलं की ४८ तास खरंच 'खूप' असतात. ट्रीपचं नियोजन करायचं म्हणून आमचे अनेक फोन झाले. कोणती ठिकाणं बघायची, काय खायचं पासून ते अगदी 'शॉपिंग' पर्यंत! हे सगळं ठरवताना 'तिच्या' स्वभावाचे एक एक पैलू मला समजत गेले. एकमेकांच्या आवडी निवडी अगदी सहजरीत्या समजल्या. आधी 'ऑनलाईन' भेटी झाल्या असल्यामुळे भेटल्यांनंतर मोकळेपणा लगेच आला.

या प्रक्रियेत मी आणि आई इंटरनेटवर अनेक मुलाखती एकत्र बघायचो. आम्ही त्यावर तासंतास चर्चा करायचो. एका मुलाखतीत खूप छान मांडणी केली होती. दोघांच्या 'गरज', 'सुविधा', आणि 'चैन' याविषयीच्या संकल्पना फार वेगळ्या नसायला हव्या. उदाहरणार्थ, माझ्यासाठी Apple airpods ही एक 'चैन' आहे. पण एखाद्या अमेरिकेतल्या मुलीसाठी ती 'गरज' असू शकते. या जर मूलभूत संकल्पना सारख्या असतील, तर साहजिकच आयुष्य कसं जगायचं याबद्दलचे विचारही सारखे असतील. आणि मग खऱ्या अर्थाने "दोघे एकमेकांना अनुरूप आहोत", असं म्हणता येईल. हे सगळं जाणून घेण्यासाठी काय प्रश्न आणि ते कसे आणि कुठे विचारायचे यावर पण विचार-विमर्श केला. जेवत असताना काय विचारलं तर योग्य राहील आणि 'युनिवर्सल' च्या 'राईड' करताना काय विचारलं तर योग्य राहील इथपर्यंत.... भेटण्याआधी या वेळेस मी 'अभ्यासपूर्ण' मार्ग घेतला असला तरी प्रत्यक्ष भेटल्यानंतर असे 'ठरवून' २१ अपेक्षित प्रश्न विचारतोय, असं कधीच जाणवलं नाही. बोलण्यातली सहजता लगेच आली...


सुरुवातीला मला वाटायचं की आवडी निवडी सारख्या असायला हव्या. पण ते काही आवश्यक

नसल्याचं जाणवलं. प्रत्येकच गोष्ट सोबत करायला हवी असं नक्कीच नाही. उदाहरणार्थ, माझं 'क्रिकेट' आणि 'चहा' वर जीवापाड प्रेम आहे. पण तिला ते अजिबात आवडत नाही. पण पहिल्यांदा भेटलो तेव्हा 'तिने' माझ्यासोबत चहा घेतला आणि क्रिकेट वर्ल्डकप संकल्पनेवर आधारित आम्ही '८३' सिनेमा पाहिला.. मी देखील एरवी तासंतास फोन वर असतो. कुठे गेलो की लगेच फोटो काढून सोशल मीडियावर टाकतो. पण केवळ 'तिला' ते फार आवडत नाही, म्हणून नकळत मोबाईल २ दिवस वापरलाच नाही! आणि तो वापरावा असं पण वाटलं नाही. या सगळ्या बारीक बारीक गोष्टी खूप भावल्या...आणि प्रत्येक गोष्ट जुळून यायला हवी, असा दोघांनी पण अट्टहास ठेवला नाही. मग ते मूळगाव असो किंवा मातृभाषा! एखाद्या गोष्टीला किंवा खासकरून व्यावहारिक गोष्टीला किती महत्व द्यायचं, हे शेवटी आपल्यावर आहे ना!

'Arranged marriage' मध्ये देखील जुन्या नव्याची सांगड घालत काहीतरी वेगळं नक्कीच करता येतं, हे मनोमन पटलं. आम्ही पूर्णपणे एकमेकांना जाणून घेतलं आणि त्यानंतरच पालक या प्रक्रियेत आले. मला वाटतं जोडीदाराची निवड आणि त्यानंतरची प्रक्रिया म्हणजे वाढदिवसाला आलेलं 'गिफ्ट' उघडून बघण्यासारखं आहे. एकमेकांना समजून घेत हळुवारपणे हे नातं तयार करायचं आहे- कोणतीही घाई न करता आणि अतिविचार न करता!!



सौरभ शेखदार





Thinking of Selling?
SAVE $1000 & GET A
FREE APPRAISAL BY US!
CONTACT ME TO DISCOVER YOUR HOME'S
WORTH AND HOW I CAN ASSIST YOU TOO!
SAGEVIEWREALTY
MUNEE PATEL
+1 669-888-6162
SAGE VIEW
REALTY & LENDING
WHY CHOOSE US?
Where homes, businesses, and financing come together
Buy | Sell | Invest
A one-stop shop for real estate & financing
Local experts with national reach
We're with you from start to finish!
Conventional Loans
FHA & VA Loans
Cash-Out Refinancing
Streamlined Refinancing Options
For more details:
www.Sageview.us
+1 669-888-6162
DRE #02248794 NMLS ID: 2637506

# एक तरी ओवी अनुभवावी!




महाराष्ट्रावर अजून देवगिरीच्या यादवांचे राज्य होते. अल्लाउद्दीन खिलजीचे लक्ष्य दक्षिणेकडे लागले नव्हते. त्या आधी पैठण जवळच्या आपेगांवी, गोदातीरी, इ.स. १२७५ ला श्री ज्ञानेश्वर माऊलीचा जन्म झाला. श्री निवृत्तीनाथ माउलीचे थोरले बंधू व गुरु, तसेच सोपानदेव आणि छोटी मुक्ताबाई अशी ही चार भावंडे होत. इ.स. १२९० सुमारास श्री ज्ञानेश्वर माउलीने, श्री मद्भगवद्गीतेवरील मूळ संस्कृतात असलेला, श्री सार्थ ज्ञानेश्वरी हा टीकाग्रंथ, नेवासे येथे श्रोत्यांना, त्यांचे गुरु श्री निवृत्तीनाथांच्या आज्ञेवरून सोपानदेव, मुक्ताबाई समवेत, मराठी भाषेत श्रोत्यांना सांगितला. तोच ग्रंथरूपाने श्री सच्चिदानंद बाबांनी लिहून घेतला. पुढे बऱ्याच लोकांनी हस्तलिखिते, स्वतःच्या अभ्यासासाठी म्हणून लिहून ठेवली. पण त्यातील एक वाक्यता नाहीशी झाली. पुढे श्री संत एकनाथ महाराजांनी

अत्यंत परिश्रमपूर्वक श्री ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत सोळाव्या शतकाच्या शेवटी, इ.स. १५८४ त, तयार केली. तीच प्रत सध्या बाजारात उपलब्ध आहे.




श्रीमद्भगवद्गीतेच्या ७०० श्लोकांचे अर्थ सांगता सांगता श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ ९००० ओव्यांचा झाला. श्रोत्यांना संस्कृत शब्दांचा नुसता अर्थ न सांगता, अगणित उपमा, उत्प्रेक्षा, अलंकाराने ग्रंथ अतिशय गेय, अती सहज कळेल अशा सोप्या शब्दात सांगितला. प्रथमतः: श्री गणेशाला वंदन करून, श्री गुरुकृपेविण,
श्रीमद् भगवद्गीतेचा अर्थ प्राकृतात सांगणे हे होणे नाही, " मज हृदयी सद्गुरू, तेणे तारिला हा संसारपुरु " असे माउली अति नम्रतेने सांगते. १ ल्या अध्यायाच्या सुरवातीच्या काही ओव्यानंतर, महाराजांनी श्रोत्यांना विनवणी केली की " शरद ऋतूच्या चंद्रकिरणातील अमृताचे कोमल कण, चकोराची पिल्ले जशी मृदू मनाने वेचतात, त्याप्रमाणेच श्रोत्यांनी हळुवार चित्ताने ही कथा अनुभवावी. अनेक अध्यायांच्या सुरुवातीच्या ओव्यांतून स्वतः:वरील असलेला गुरुकृपेचा वरदहस्त आणि त्यांचे आपल्यावरील प्रेमाचा उल्लेख केल्यावाचून ते राहत नाहीत.



श्रीमद्भगवद्गीतेची अपूर्व अशी गीतेची महती वर्णन करताना, माउली म्हणते, वेदांचे सार महाभारताच्या सव्वा लक्ष श्लोकात आले आहे, त्या महाभारताचे सार गीतेच्या ७०० श्लोकात आले आहे, १८ वा अध्याय हा एक अध्यायीं गीताच आहे आणि त्यातही हा खालील श्लोक सर्वस्व आहे,**यत्र योगेश्वरः कृष्णो, यत्र पार्थो धनुर्धरः ।तत्र श्रीः विजयो भूतिःध्रुवा नीतीः मतीः मम ।।** ज्याच्या बाजूला योगेश्वर कृष्ण व जेथे धनुर्धर पार्थ आहे तेथे तेथे श्री, विजय, ऐश्वर्य आणि अढळ नीति आहे. हा श्लोक संजयच्या तोंडी असून तो हा धृतराष्ट्र राजाला सांगत आहे, संजय स्वतः आपल्याला झालेल्या आनंदाचे वर्णन ' हृष्यामिच पुनः पुन्हा ' असे करतो आहे. ज्यांच्या कृपाप्रसादाने हा आनंद आपल्याला मिळाला त्या श्रीव्यासांचे तो आभार मानतो आहे. पण धृतराष्ट्र त्याला म्हणतो की श्री व्यासांनी तुला कुरुक्षेत्रावरील घडत असलेल्या गोष्टींची फक्त

हकीगत सांगायची  म्हणून ही दिव्य दृष्टी दिली आहे, पुत्रमोहाने आंधळा झालेला धृतराष्ट्र पुढे म्हणतो की दुर्योधन हा अर्जुनाहून अधिक प्रतापी असून त्याच्याकडे पांडवा पेक्षा दीडपट सैन्य आहे, तेव्हा त्याचा विजय निश्चित आहे, त्यावर मोठ्या खुबीने वरील उत्तर संजयाने दिले आहे.

आपली गुरुपरंपरा सांगताना श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, क्षीरसमुद्राच्या ठिकाणी आदिगुरू श्री शंकराने आपले गुह्य ज्ञान पार्वतीला एकांतात दिले, ते माशाच्या रूपाने श्री मत्स्येंद्रनाथ यांना ऐकायला मिळाले, त्यानंतर गोरखनाथ, गहिनीनाथांना परंपरेने मिळाले. गहिनीनाथांनी एक शिष्य एक गुरु ही परंपरा सोडुन, सर्व संसारग्रस्तांना त्याचा लाभ व्हावा म्हणून श्री निवृत्तीनाथांना सांगितले, श्री निवृत्तीनाथांनी मला निमित्त केले व हे अलौकिक धन सर्व जगाला प्राप्त केले गेले आहे.



गीतेसारख्या असामान्य ग्रंथावर टीका करण्याची माझी योग्यता नाही, हे केवळ श्री गुरु निवृत्तीनाथांच्या कृपेचे फळ आहे, त्यांच्यामुळॆ त्रैलोक्यात निरुपम होईल असा हा ग्रंथ निर्माण झाला असा स्वच्छ निर्वाळा महाराज देतात. श्री गुरुचे पाईकपण पत्करले, मी केवळ पुरोहित. त्यामुळे ही  १८ अध्यायीं गीता प्राकृतात सांगताना, " उणे ते पुरते, अधिक ते सरते" करून घ्यावे असे ते म्हणतात.

श्री गुरु निवृत्तीनाथांचा व ज्ञानेश्वरादि भावंडांचा त्या काळच्या लोकांनी खूप छळ केला तरी ज्ञानेश्वरीच्या शेवटी परमेश्वराजवळ जी प्रार्थना, जे पसायदान सर्वांसाठी मागितले त्यामध्ये त्यांची विश्वकल्याणाची कळकळ दिसून येते. दुष्ट लोकांच्या विचारात फरक पडून त्यांचा उद्धार होऊन ते ईश्वरनिष्ठ कसे होतील, त्याच्या वृत्तीत फरक  होऊन दुष्ट कर्मे टाकून त्यांची बुद्धी सत्कर्मे करावीत अशी व्हावी. एकमेकांशी बंधुभावाने वागावे. सगळीकडे धर्माची वाढ व्हावी, सर्व लोक सुखी व्हावेत, संत महात्मे निरंतर ह्या पृथ्वीतलावर असावेत असे मागणे त्यांच्या पसायदानात आहे. "तुझ्या म्हणण्याप्रमाणे होईल" असा आशीर्वाद त्यांना श्री गुरूकडून मिळाला.

आपण मराठी, आपला जन्म मराठी आई वडिलांच्या पोटी झाला ह्याचा सार्थ अभिमान आपण बाळगतो. त्याहीपेक्षा आपण किती भाग्याचे आहोत आपल्याला मराठी भाषा कळते, आपण मराठी भाषा बोलतो, आपली ती मातृभाषा आहे. प्रत्येक मराठी कुटुंबियांच्या घरी ही श्री सार्थ ज्ञानेश्वरी असावी व त्याचा अभ्यास अत्यंत भाविकतेने करावा असे वाटते. आपली मराठी भाषा किती समृद्ध आहे ह्याचा प्रत्यय आपल्याला माऊलीच्या प्रत्येक ओवीत येईल. ७०० वर्षांपूर्वीची मराठी भाषा आज समजायला अवघड वाटली तरी आजच्या मराठी भाषेत अनेकांनी हा अर्थ २०व्या शतकातील मराठी बोली भाषेत विस्तारपूर्वक सांगितला आहे. श्री. सोनोपंत दांडेकर आणि इतर अनेकांनी, आपला मार्ग सोपा करून ठेवला आहे. श्री कृष्ण भगवान असे सांगतात की अनंत जन्मीचे पुण्य गाठी असेल तर गीता शास्त्र ऐकायला मिळते. जे श्रोते श्रद्धेने व आदराने ऐकतात ते मला अतिप्रिय आहेत. १८ अध्यायीं गीता भगवंताने अर्जुनाला सांगितल्यावर सुद्धा, "मी जे तुला सांगितले ते बोलण्या, ऐकण्या, पलीकडे आहे, असे हे गुह्यात गुह्यतम ज्ञान तुला, तुझ्यावरील प्रेमामुळे दिले. तरी सुद्धा "यथेच्छसि तत् करू" असेच सांगतात. १८ अध्यायातील सातशे श्लोकांत भगवंताने एकच गोष्ट सांगितली ती म्हणजे, जीवाच्या मागचे संसार दुःख जायचे असेल तर त्याला "ज्ञान" हाच एक उपाय आहे. 'माझिया सत्यवादाचे तप, वाचा केली बहुत कल्प, तया फळांचे हे महाद्वीप, पातली प्रभू.' माझ्या वाचेने सत्य बोलण्याचे व्रत जन्मजन्मांतरी केले त्या पुण्याईचे फळ म्हणून श्री गुरुची भेट झाली. त्यांच्या कृपेमुळे गीतेसारख्या अगम्य आणि अवघड अशा ग्रंथाचे निरूपण करण्याचे भाग्य मला लाभले आहे, असा निर्वाळा माउली १६ व्या अध्यायात देतात.

आपण सारे ज्या ज्या पायरीवर उभे आहोत तिथूनच गीतेचा, पर्यायाने श्री ज्ञानेश्वरीचा अभ्यास, धर्माने, श्रद्धेने व निष्ठेने करायचा आहे. दररोज निदान अर्धा एक तास जशी इच्छा असेल त्याप्रमाणे एकांतात झाल्या गेल्या गोष्टींचा, बोलण्या वागण्याचा आढावा घ्यावा आणि मग हळूहळू पुढील मार्ग आपल्या ला आपोआप दृष्टिपथास येईल असा निर्वाळा ज्ञानेश्वर माउली ज्ञानेश्वरीत जागोजाग देतात, त्याची प्रचिती प्रत्येकाने घ्यावी. नित्यनेमाने सतत ह्या गोष्टीचा ध्यास घ्यावा. शिक्षण पूर्ण होण्यासाठी आयुष्याची २५ वर्षे आपल्याला लागली, तसेच समृद्धी, धनसंपदा मिळवण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्न करीतच आहोत. चार दोन महिने एकांती बसल्यावर,' हॅ! काहीच होत नाही ' म्हणून सोडून देऊ नये. श्रीमद्भगवद्गीता, श्री ज्ञानेश्वरी हा मराठी मनाचा अस्सल धर्मग्रंथ. त्यातील विषयाचे चिंतन,

मनन करून आपली आत्मोन्नती करून घ्यावी, हाच आपल्या अस्तित्वाचा हेतू आहे, असं श्री ज्ञानेश्वर माउली म्हणते.

श्री ज्ञानेश्वर माऊलीची, ही सार्थ ज्ञानेश्वरी, हा काव्यारावो आहे असे म्हणतात. मराठी भाषेतील हे सर्वोत्कृष्ट काव्य आहे. रोग्याने औषध घ्यावे म्हणून वैद्य औषध गोड करून देतो त्याचप्रमाणे हा ब्रह्मरस लोकांनी आवडीने प्यावा म्हणून ज्ञानेश्वर माउलीने अनेक उपमा, तसेच दररोजच्या व्यवहारातील उदाहरणे देऊन आपल्या सर्वांपुढे ठेवला आहे. वरील वैद्य आणि रोग्याचं उदाहरण पुढे न्यायचं झाल्यास, वैद्य रोग्यास दोन प्रकाराने औषध देतो. एक म्हणजे रोग लगेच पण तात्पुरता बरा होऊन रोग्यास आराम वाटावा म्हणून, किंवा दुसरा प्रकार म्हणजे असे औषध देणे की रोग बरा होण्यास जरा वेळ लागेल पण पुन्हा म्हणून हा रोग होणार नाही. अर्जुनाने वास्तविक श्रीकृष्णाला जो प्रश्न विचारला तो नीतीचा होता की, "समोर माझे गुरुजन, आजोबा, सगे सोयरे, नातवंडे, मित्र परिवार, लढण्यासाठी उभे आहेत, त्यांना मी कसे मारू, त्यांना मारून मला त्रैलोक्याचे राज्य मिळाले तरी हे करणे नको. मोहामुळे माझी मूळ वृत्ती नष्ट झाली आहे, तसेच धर्म संबंधाने चित्त ठिकाणावर नाही तेव्हा मला जे श्रेयस्कर असेल ते, मी तुझा शिष्य म्हणून मला सांग". भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाची समूळ संशय निवृत्ती व्हावी, त्याचा विषाद जेणेकरून जाईल, अशा तऱ्हेने एखादा प्रेमळ सखा कसा असावा, संवाद रूपाने उच्च जीवन कसे असावे हे समजावून सांगितले. अर्जुनास लढाई करावयास लावले पण समाधिस्त करून, आनंदरूप करून, शोक मोहाच्या पलीकडे नेऊन.

१८व्या अध्यायाच्या शेवटी, अर्जुन म्हणाला, हे अच्युता! तुझ्या कृपेमुळे माझा मोह नष्ट झाला, मला माझ्या खऱ्या स्वरूपाचे स्मरण झाले, मी संशयरहित झालो आहे, आता मी तू सांगशील ते करीन. श्री ज्ञानेश्वर माउलीने हा आपल्या साठी केवढा अनमोल ठेवा दिला आहे.

श्री संतश्रेष्ठ नामदेव महाराज, हे श्री ज्ञानेश्वर महाराजांहून जवळ जवळ २०, २२ वर्षांनी मोठे होते त्यांनी लिहिलेला हा एक अभंग,

ज्ञानराज माझी योग्याची माउली, जेणे निगमावली प्रगट केली ।
छप्पन्न भाषेचा केलासे गौरव, भवार्णवी नाव तारावया ।।
गीता अलंकारी नामे ज्ञानेश्वरी, ब्रम्हानंद लहरी प्रगटली ।
नामा म्हणे ग्रंथश्रेष्ठ ज्ञानदेवी, एक तरी ओवी अनुभवावी ।।

।। शुभं भवतु, मंगलम भवतु ।।

कुमार कुलकर्णी



# ।।बुद्धं शरणं गच्छामि।।



चित्रकार :
इरा कुलकर्णी (वय १२ वर्षे)

# हवा 'हवाई'...


२०२४ च्या वर्षा अखेरीस आमच्या 'बकेट लिस्ट' मधली एक गोष्ट आम्ही पूर्ण केली. नोव्हेंबर महिन्यात आम्ही दोघं 'हवाई' फिरायला गेलो होतो. हवाई या अमेरिकेच्या राज्यात एकूण प्रमुख ८ बेटं आहेत. पण त्यातली ४ प्रसिद्ध आहेत- Maui, Big Island, Oahu, Kauai. ही सगळी बेटं अमेरिकेच्या पश्चिम किनारपट्टीवरून साधारण ४,००० कि.मी. अंतरावर स्थित आहेत. या ट्रिप मध्ये आम्ही Maui (माउई) आणि Kauai (कुवाई) बेटांवर फिरलो. अगदी ऐनवेळेवर ५ दिवसांच्या ट्रिपचे नियोजन केले होते- त्यातले २ दिवस माउई बेटावर आणि ३ दिवस कुवाई बेटावर...
कॅलिफोर्निया पासून आम्हाला विमानाने जायला साधारण ५ तास लागले. इथून सकाळी दहाला निघालो आणि तिथे दुपारी दीड वाजता पोहोचलो. हवाईची वेळ कॅलिफोर्नियाच्या दोन तास मागे असल्यामुळे तिथे गेल्यावर फिरायला अर्धा दिवस मिळाला. पहिल्या दिवशी आम्ही प्रसिद्ध Halekala National Park ला सूर्यास्त बघायचा, असं ठरवलं होतं. खरं तर हे पार्क सूर्योदयासाठी प्रसिद्ध आहे, पण त्यासाठी आधी पास काढावा लागतो आणि आम्ही त्या वेळेपर्यंत पोहोचू शकणार नव्हतो. त्यामुळे आम्ही सूर्यास्त बघायचे ठरविले. इथला सूर्यास्त देखिल अविस्मरणीय होता. सूर्यास्त पाहताना नकळत "आज मै ऊपर, आसमान नीचे" या गाण्यांच्या ओळी अगदी सहज ओठांवर आल्या. सुरुवातीला घाट प्रवास सुरु झाला तेव्हा प्रचंड धुकं होतं. एक तासभर प्रवास करून आम्ही ढगांच्या वर गेलो. आपल्या दैनंदिन आयुष्यात सुद्धा अनेकदा असं होतं, अगदी तसंच...अनेक अडथळे येतात. कधी कधी कसं वागावं, हेच उमजत नाही. अगदी सगळं अंधुक असतं, या दाट धुक्यासारखं. पण आपल्या प्रयत्नांवर विश्वास ठेवत पुढे जात राहिलं की मार्ग सापडतो, जणू हेच शिकवणारा हा घाटाचा रस्ता...सूर्यास्ताच्या रंगछटा सुरेख होत्याच पण त्यानंतर आकाशातले तारे पण तितकेच अविस्मरणीय होते. आकाश निरीक्षणासाठी देखिल हे ठिकाण प्रसिद्ध आहे. कमी प्रदूषणामुळे इथले तारे अधिक ठळकपणे दिसतात. अशा प्रकारे पहिले ठिकाण ठरवल्या प्रमाणे आम्ही पाहिले. माझ्या मित्राने सांगितल्याप्रमाणे आम्ही कॅलिफोर्निया-हवाई या प्रवासात आम्ही 'जेटलॅग' जाऊच दिला नाही. मला वाटतं सहल नियोजनातील ही सगळ्यात महत्त्वाची टीप होती. आम्ही लवकर झोपून लवकर उठल्यामुळे आम्हाला सूर्यप्रकाश असताना बरीचशी ठिकाणं बघता आली. लवकर दिवसाची सुरुवात केल्यामुळे सगळीकडे गर्दी पण तुलनेने कमीच होती.



दुसऱ्या दिवशी आम्ही “Road to Hana” केले. ही सुमारे ६५ मैलांची अनेक वळणावळणांची ड्राईव्ह आहे. घनदाट वर्षावने (Rainforest), असंख्य धबधबे आणि एका बाजूला विस्तीर्ण किनारपट्टी- ही प्रमुख वैशिष्ट्ये. “ओपन रूफ/Convertible car” असल्यामुळे या ड्राईव्हची अजून मजा घेता आली. एक-दोन ठिकाणी धबधबे बघायला जाण्यासाठी छोटासा ट्रेक होता. त्या ट्रेकवर विविध प्रकारची फुलझाडे बघायला मिळाली. ही जैवविविधता हवाई बेटांचे विशेष वेगळेपण दर्शवते.
या ड्राईव्ह मध्ये अनेक ठिकाणी आपल्याकडे असतात तशा वाटेत छोटी दुकाने आणि टपऱ्या दिसल्या- शहाळे, आईस्क्रीम, फ्रेश फळं आणि कॉफी वगैरे. मी अशी छोटी दुकाने अमेरिकेत पाहिली नव्हती- त्यामुळे मला नवल वाटले. अमेरिकेत टू-व्हीलर अगदी कमी पाहिल्या मिळतात, पण इकडे काही लोकं बाईकवर पण दिसत होती. नागमोडी वळणे, विस्तीर्ण समुद्र आणि किनारपट्टीमुळे कोकणात फिरतोय की काय, असा भास झाला. वाटेत एके ठिकाणी प्रसिद्ध असलेला ‘Banana Bread’ पण खाल्ला. अनेक ठिकाणी विविध प्रकारचे शाकाहारी पदार्थ मिळतील अशी छोटी दुकाने दिसली (food trucks).











याच दिवशी आम्ही माउईतील प्रसिद्ध, काळी वाळू असलेल्या समुद्र किनारी गेलो (black sand beach). ह्याला आधी बुकिंग करणं आवश्यकच होतं. संपूर्ण काळ्या वाळूमुळे या किनारपट्टीला वेगळेपण, होते पण इकडे तुलनेने पर्यटकांची प्रचंड गर्दी होती. आजच्या दिवसातले मला सगळ्यात भावलेले ठिकाण म्हणजे- Wailua valley lookout. २०-३० पायऱ्या चढून जायचं होतं आणि वरून चारही बाजूला निसर्गसौंदर्य, किनारपट्टी, बारीक पाऊस, थोडंसं धुकं, समुद्रावरती इंद्रधनुष्य...जणू निसर्गाची सर्व रूपं एकाच वेळी बघायला मिळाली. या दोन्ही दिवसात आम्ही इंद्रधनुष्य २-३ वेळेस पाहिले. बाकीच्या प्रदेशात इंद्रधनुष्य बघायला मिळालं तरी बहुतांशी वेळेस सुखद धक्का बसतो, वेगळेपण वाटते पण हवाई बेटांवर जणू ते रोजच बघायला मिळते. तिसऱ्या दिवशी सकाळी उठून आम्ही अजून एका 'बीच पार्क'ला गेलो. तिथे एके ठिकाणी प्रचंड जोरात वाहणारा वारा होता.





इतका वारा होता की फोटो काढताना मोबाईल उडून जाईल की काय, असं वाटत होतं. अगदी 'हवा हवाई' गाण्याच्या बोलाप्रमाणे. 'बीच पार्क'च्या जवळच स्थानिक फळांच्या जॅम आणि हवाई स्पेशल चॉकलेट्सची दुकानं दिसली. आपण नेहमी खातो त्या फळांच्या जॅमची चव माहित असते. कधी ऐकली पण नव्हती अशा वेगळ्या फळांचे जॅम इथे होते, आणि त्याची चव खूपच आवडली. तिकडे किरकोळ खरेदी करून आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो. हवाई बेटांवर केवळ निसर्ग सौंदर्य आणि खाण्याच्या पदार्थांमध्ये वेगळेपण नसून ते भाषेत देखिल आहे.



अगदी ‘नमस्कार’ आणि ‘धन्यवाद’ याला देखिल स्थानिक शब्द आहेत. इथली लोकं त्यांच्या स्थानिक भाषेवर खूप प्रेम करतात, हे त्यांच्या बोलण्यावरून जाणवले. इथल्या लोकांच्या बोलण्यात पण एक प्रकारचा गोडवा आणि आपलेपणा वाटतो. दोनच दिवसात हवाई बेटांवर वापरले जाणारे खास शब्द- ‘अलोहा’ (hello) आणि ‘महालो’ (Thank you) अगदी तोंडात बसले होते.



माउई वरून कुवाई बेटावर जायला पाऊण तासाचे विमान होते. विमानात बसल्याक्षणी काहीच वेळात आपण उतरतोय अशी घोषणा झाली, असे वाटले. कुवाई बेट वरून अगदी हिरवेगार वाटले.अनेक धबधबे सुद्धा दिसले. शाळेत पाठ असलेली ‘श्रावण मानसी…हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे’ ही कविता आठवली. कुवाई बेट पाहण्यासाठी आम्ही खूप उत्सुक होतो.





सौरभ शेखदार



# “पत्रापत्री” च्या निमित्ताने



***श्री. दिलीप प्रभावळकर ह्यांची माफी मागून त्यांच्या दर्जेदार कलाकृतीला माझी दोन पत्ररूपी ठिगळं जोडत आहे. निव्वळ मनोरंजन म्हणून वाचावे ही विनंती. ****

प्रिय तात्याराव,

मागील पत्रात तुम्ही सांगितले होते कि तुम्ही अमेरिकेत आहात आणि आजच दैनिकात जाहिरात बघितली कि दोन विक्षिप्त म्हाताऱ्यांच्या पत्रव्यव्हरावर आधारित *पत्रा पत्री* हा कार्यक्रम अमेरिकेचा दौरा करतोय. नाना पाटेकरांप्रमाने दिलीप भैयांशी पण तुमची ओळख असेलच, तेव्हा तुम्ही हा प्रयोग अमेरिकेत बघितला का ? अमेरिकेत मराठी नाटक सादर करताना देखील आफ्रिकेसारखे ट्रान्सलेटर असतात का? कि थिएटर मध्ये स्टेजच्या खालच्या बाजूला सबटाईटल्स धावतात? नाही... पुढारलेला देश असल्याने अशा शंका आल्या मनात.. तुमच्याकडून ह्या प्रयोगाचे वर्णन ऐकायला नक्की आवडेल

- तुमचा नाटकवेडा माधवराव

प्रिय माधवराव,

काय योगायोग सांगावा.. मी तुम्हाला ह्या नाटकाविषयीच पत्र लिहीत होतो आणि त्याचवेळी त्याबद्दल विचारणा करणारे तुमचे पत्र मिळाले.. तुमच्या सर्व शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न करतो.. तर दिलीप प्रभावळकर ह्यांच्याशी ओळख... हो..पण त्याआधी तुम्ही त्यांना दिलीप भैया असे कसे संबोधलेस? तुमचा आणि मनोरंजन विश्वाचा संबंध फक्त निव्वळ प्रेक्षक म्हणून , मग एकदम सलगी असल्यासारखे तुम्ही त्यांना दिलीप भैया संबोधावे हे जरा खटकते.. असो, माझी ओळख म्हणाल तर

तशा दोन ओळखी निघाल्या दिलीप भैयांशी...हो मी दिलीप भैया बोलू शकतो कारण एका मराठी सिरीयल (बंद पडलेली असली तरीही) मध्ये काम केल्याने तेवढा हक्क आहे मला. तर, नाना पाटेकरांप्रमाणे ह्याही वेळी ओळख आमच्या हिच्या बाजुनेच निघाली.
दिलीप भैया एका मोठ्या बँकेचे ब्रँड अम्बॅसॅडर असताना एका कार्यक्रमासाठी बँकेच्या कोल्हापूर शाखेत गेले होते.. त्यावेळी काही सुवासिनींनी त्यांची ओवाळणी केली होती.. त्या सुवासिनीं पैकी एक म्हणजे हिची मामे बहीण.. दिलीप प्रभावळकर यांना ओवाळणी करायला मिळणार ह्यासाठी हिची मामेबहीण एक आठवडा तिच्या मिस्टरांसोबत ह्याचा सराव करत होती.. पण दिलीप भैयांची उंची आणि तिच्या मिस्टरांची उंची ह्यात बरीच तफावत असल्याने ऐन ओवाळणी च्या वेळी हिच्या मामेबहिणीचा गोंधळ उडाला. उत्साहाच्या भरात तिने ओवाळणीचे ताट दिलीप भैयांच्या हनुवटीच्या एकदम जवळ नेले आणि "चटका लावून जाणारी ओवाळणी" काय असते ह्याचा प्रत्यय दिला.. त्यामुळे ही ओळख दिलीप भैयांच्या नक्कीच लक्षात असेल..
दुसरी ओळख थोडी जुनी होती.. दिलीप भैय्यांने रुईया कॉलेज मध्ये असताना सादर केलेल्या जनावर ह्या एकांकिकेत एक प्रेक्षक विद्यार्थी टवाळ्या करून कंमेंट्स पास करत होता आणि तो दुसरा तिसरा कोणी नसून हिचा तीन नंबरचा काका होता.. कदाचित त्याच्या असल्या वागण्यानेच त्याने उमेदीची बरीच वर्ष कॉलेज मध्येच काढली.. तर, दोन्ही ओळखी तशा सांगण्याच्या लायकीच्या नसल्या तरीही त्यातल्या त्यात मामेबहिणीची ओळख सांगितली (चटका लावणारी दुसरीच असे सांगुन )

आता प्रयोगाबद्दल सांगतो.. सर्व प्रथम माझ्या नजरेत पडली ती ह्या कार्यक्रमाची जाहिरात..
**Don't miss the opportunity to see legend Dilip Prabhavalkar in your backyard** ही जाहिरात बघून मी लगेच सुनेला विचारलं की खरोखर दिलीप प्रभावळकर सर्व तिकीट धारकांच्या बॅकयार्ड मध्ये भेट देणार का ? काय सांगाव अमेरिकेत अशीच नाटकं होत असावीत.. आमच्या सुनबाई मग जोरात हसल्या आणि मला समजावलं की ही एक बोलायची पद्धत आहे.. मागच्या वेळी पण जाहिरात होती .. **Madhuri Dixit coming to your home**.. आणि त्यामुळे काही उत्साही सभासदांनी घराची साफसफाई करून ठेवली होती आणि नंतर लक्षात आले कि माधुरी येत नसून तिचा Bucket list हा चित्रपट येत आहे त्यामुळे भ्रमनिरास झालेल्या काही सभासदानी पुढील काही वर्षे मंडळाशी अबोला धरला होता म्हणे..तसेच काही सभासदांनी "ह्या वयात आमच्या भावनांशी असे खेळू नका" अशी मंडळाकडे विनंती केल्याचे समजले.
खर सांगतो माधवराव, मागचा एक महिना ह्या गावातील मंडळी ह्या प्रयोगासाठी खूप उत्साहाने काम करत होती.. आयोजक मंडळी तर एकदम प्रोफ़ेशनल पद्धतीने काम करत होती.. प्रत्येक कामासाठी वेगवेगळ्या टीम्स केल्या होत्या.. आणि प्रत्येक टीमला फक्त त्यांच्याच कामाची माहिती दिली जायची .. एकदम अमेरिकन security agency (fBI ) प्रमाणे काम चालले होते.. टीम्सला सर्व माहिती फक्त

need to know बेसिस वरती पुरवली जात होती .. प्रत्येक टीमची एक बॅकअप टीम होती आणि मूळ टीमला ह्याची कल्पना देखील नव्हती .. काही टीमसाठी तर बॅकअप ची पण बॅकअप टीम होती ..आमच्यासाठी चक्रावून टाकणारी माहिती म्हणजे ह्या मंडळींनी चक्क दिलीप भैया ह्यांच्या कामासाठी पण बॅकअप तयार ठेवला होता म्हणे.. जर जेटलॅगमुळे दिलीप भैया फोटो सेशन साठी उपलब्ध नसतील तर लगेच बॅकअप रेडी .. त्याचवेळी माझ्या डोक्यात कल्पना चमकली कि आपण सुद्धा विजय केंकरेंचा बॅकअप म्हणून ह्या आयोजनात सामील होऊया.. लगेच सुनबाईना सांगितले. माझ्या सिरीयल च्या अनुभवामुळे तसेच नाना आणि दिलीप भैया ह्यांच्या ओळखी मुळे आयोजक मंडळींनी मला तसे लगेच सहभागी करुन घेतले पण काही जणांनी मात्र तात्या विंचू ह्या भूमिकेसाठी दिलीप प्रभावळकर ह्यांनी खरेच दात वाढवले होते का? असे कोंडीत टाकणारे प्रश्न मात्र विचारले होते.. मीही सफाईने नरो वा कुंजरोवा करत हा विषय त्यांच्या डेंटिस्ट डॉक्टर प्रयोजकांवर सरकावला..

आयोजनात सहभागी झाल्यावर मात्र सर्व मंडळीची मेहनत दिसून आली.. वेगवेगळ्या कार्यक्षेत्रात अग्रस्थानी असलेली ही मराठी मंडळी एकत्र येऊन सर्वच कामे सामान्य स्वयंसेवकांप्रमाणें करत होती मग ते सेट, सामान लोड करणें असो कि सेटच्या कपड्याना इस्त्री करणे असो की अजून काही.. सर्वच जण नाटकाच्या यशस्वी आयोजनासाठी मेहनत घेताना दिसले.. अपवाद होता तो प्रकाश आणि ध्वनी साठी मदत करणारा कार्यकर्ता.. सगळी कामे नाटकाच्या संचासोबत आलेला धनेश एकदम सफाईने करत होता.. आणि हा कार्यकर्ता मात्र उगाचच इकडे तिकडे फिरत होता .. मला तर तो वशिल्याचा माणूस दिसतोय .. असो, पण

माधवराव, बाकी सर्व मंडळींची जिद्द , मेहनत नक्कीच वाखाणण्याजोगी आहे. आणि तुम्ही विचारले कि ट्रान्सलेटर होते का.. अहो, हे नाटक इथल्या मराठी प्रेक्षकांसाठी असल्याने ट्रान्सलेटरची गरजच नव्हती.. इथल्या मराठी प्रेक्षकाला ह्या विनोदाची पुरेपूर जाण असल्यामुळेच तो दिलीप भैया आणि विजय केंकरे ह्यांच्या अप्रतिम कामाला तशीच दाद देत होता. हो, प्रेक्षकांची संख्या अजून वाढायला हवी पण ही मंडळी हळूहळू तेही करून दाखवतील (म्हणजे प्रेक्षकांना नाट्यगृहापर्यंत आणण्याचे काम .. उगाच गैरसमज नको ) अशी आम्हाला खात्री वाटते.. प्रत्यक्ष नाटकाबद्दल सर्व प्रेक्षकांनी सुंदर प्रतिक्रिया दिल्या आहेत whatsapp वर .. सुनबाईना सांगून त्या तुझ्या माधवसुताला फॉरवर्ड करतो.. हो, त्यातून काही कविता करू नकोस म्हणावं.

चला, मागचा एक महिना मी स्वतः काहीही न करता फक्त आयोजक मंडळींची धावपळ बघून थोडा थकलो आहे, तेव्हा थोडी विश्रांती घेतो..

आणि हो , तो वरती नमूद केलेला वशिल्याचा कार्यकर्ता दिलीप भैया आणि विजय केंकरे ह्यांच्याशी "एक होती माया" ह्या पुस्तकाबद्दल काहीतरी बोलत होता बाबा .. मला तर काही गौडबंगाल

वाटतेय.. ह्या साध्या माणसांना हा फसवत तर नसेल? तेव्हा मुंबईतून ह्या पुस्तकाची थोडी माहिती पाठवावी ही विनंती.

- आपला रंगकर्मी तात्याराव
(नाटकाच्या आयोजनात सहभागी असल्याने आम्हीही आता रंगकर्मी झालो आहोत )

ता.क. दिलीप भैया आणि विजय केंकरे ह्यांनी उत्साहाने सर्व प्रेक्षकांना फोटो दिल्याने, आम्हा बॅकअप्सना कामाची संधी मिळाली नाही,  तरीही, पुढे कधीतरी संधी मिळेल असा मन में है विश्वास!

संदीप बिडये



# मागील कार्यक्रमांची क्षणचित्रे

## होळी/रंगपंचमी









# स्पोर्टस डे








# गणेश मूर्ती कार्यशाळा







# गणेशोत्सव




कामधेनू
उच्चैश्रवस्
लक्ष्मी देवी
चंद्र देव
ऐरावत
वारुणी (मद्य)
पारिजात वृक्ष
अप्सरा
कालकूट विष
शंख
कल्पवृक्ष
पंचजन्य
अमृत
कौस्तुभ मणि
धन्वंतरि
समुद्र मंथन


अमृत
कौस्तुभ मणि




Tiffin and Catering

# दिवाळी










Thank You!!!






NIESHA




AMBROSIA
Tiffin and Catering
sharing an ethnic and exquisite
TASTE of HOME
CONTACT
(802) 734 3893

# काव्यांजली



# पाया"चे महत्व

(पाय मुरगळल्यावर सुचलेली कविता )

पाया पडतो हे पाया, नजर ना दिली तुजकडे कधीची
डळमळीत झाला आज, तेंव्हा कळली महती पायाची

सैपाकघरापर्यंत केवळ अंतर आता भासते मैलांचे
जिनेतर दूर राहिले जणू हिमालयचे शिखर उंचसे

होय ऐकले होते शिखराचे मोठेपण पायात असते
हन्त! आज पाय मुरगळले तेंव्हा प्रत्यक्ष कळले ते

कधी मैदानी खेळ होईल माझा आता याचीच काळजी
कोचावरी बसोन चॅनेल्स तरी किती फिरवू टीव्हीची

आधीच होता आळसाचा स्वैर अंगीकार म्हणूनच कि काय
जणू कारण मिळाले, बसा आता लम्बे करुनी दुखरे पाय

अनेक कामे कशी सहज व्हायची याची नव्हती चिंता
त्रिवार वंदन करतो आज शरीराच्या या सहज यंत्राचा

माणसारे जरा शिक, नुसत्या नको करू वल्गना उंचीचा
पाया मजबूत असे तरी दे त्याला एक क्षण सहानभूतीचा

जेंव्हा पाय अधू होतील, तेंव्हा कळेल त्यांचे महात्म्य
बुद्धीचेच नको कौतुक फक्त, पायांचे जाण ते हौतात्म्य

अजित नातू



# मनुताई

गुलाबी थंडीत,  सूर्यकिरणांची दुलई पांघरून
गाडीच्या टपावर बसल्या आहेत मनुताई !
बंद गाडीतून जाणाऱ्या भुभूंना टुकटुक करत म्हणतात ,
मला नाही बाई कश्या कश्याची घाई  !



मोहिनी बर्वे



# अपेक्षा

आनंद माझा दुःख माझे
का माझ्यावर अपेक्षांचे हे ओझे
नजर शून्यात
विचार अशक्यात
माझ्या मनाची ही गरुड झेप
का तुमचा आक्षेप?
आनंद माझा दुःख माझे
का माझ्यावर अपेक्षांचे हे ओझे
आवडते मला विज्ञान
का पाजितां तुमचे ज्ञान?
खेळतो मी विटी दांडू
का अडवता माझा चेंडू?
आनंद माझा दुःख माझे
का माझ्यावर अपेक्षांचे हे ओझे
स्वप्न माझे रंगीत
गात तुझे संगीत
मन माझे चलबिचल
का त्यांची किलकिलं
आनंद माझा दुःख माझे
का माझ्यावर अपेक्षांचे हे ओझे
अटळ आहे घाण सारी
अटळ आहे ही शिसारी
चल आटोप सारे रगड
माझ्या मना बन दगड
आनंद तुझा दुःख तुझे
नाही तुझ्यावर अपेक्षांचे हे ओझे

संदेश मालपुरे




Your Safety is Our Main Concern!
PAWAR DENTAL
CORPORATION
Dr. Amar Pawar
Trust us with your family's dental care
Call Today for an Appointment
(916) 235-6212
Benefits We Offer:
• Dental Cleanings
• Low Radiation Digital X-Rays
• Sedation Dentistry
• Dental Crowns
• Teeth Whitening
• Oral Surgery
• Dental Fillings
• Sleep Apnea
• Implants and Bridges
• Dental Emergencies
• Most Insurance Accepted
• Caring and Helpful Office Staff
www.FolsomFamilyDental.com • 1568 Creekside Dr. Suite 202, Folsom, CA 95630


mantra
vegan & vegetarian
1870 Prairie City Rd #500, Folsom, CA
916-999-1749 | mantraindian.com

# MMSAC High School Awards 2025-26




**Aditi Bagul**
***Winner – High School Arts Competition***

At just 17 years old, Aditi Bagul is a remarkable example of artistic excellence and dedication. A gifted violinist and pianist, she is also the published author of a 77,000-word fantasy novel, *Sienna Cogsworth & the Legend of the Sparrows*, which is inspiring young readers in India and beyond. Balancing rigorous AP coursework with her passions for music and writing, Aditi demonstrates exceptional creativity, discipline, and vision. Today, we proudly celebrate her outstanding achievements and the bright artistic future she represents.

**Asmi Chordia**

***Co-Winner – High School Social Leader Award***

Asmi Chordia exemplifies leadership through compassion and service. Her impact spans from fostering animals and volunteering at shelters to co-founding *Girls Globe*, a nonprofit supporting women's health across 16 countries. Within her school community, Asmi has led sustainability initiatives, mentored freshmen through Link Crew, and championed meaningful service projects. With over 200 hours of dedicated service, she reminds us that true leadership is rooted in empathy, purpose, and responsibility. Today, we celebrate Asmi as an inspiring young leader creating lasting change.



**Aniruddha Bhosale**
***Co-Winner – High School Social Leader Award***

Aniruddha Bhosale's leadership journey reflects initiative, commitment, and a deep sense of responsibility to his community. From his early volunteer work with MMSAC to founding the *Building Better Communities Club* at Folsom High School, Aniruddha has turned vision into action. His efforts include organizing park cleanups, wildfire relief fundraisers, and support events for veterans and neurodiverse students. Through his involvement in Interact Club, California Scholarship Federation, and local service initiatives, Aniruddha consistently leads with compassion. Today, we honor his dedication to building a stronger and more inclusive community.



**Aarav Mangrulkar**

Aarav Mangrulkar, a junior at Vista del Lago High School, represents the highest standards of academic excellence and innovation. With a remarkable 3.98 unweighted GPA and an ACT score of 34, placing him in the 99th percentile nationwide, Aarav has challenged himself through seven AP courses and nine community college classes. His entrepreneurial spirit is reflected in his co-creation of *CourseForge*, an AI-driven study

app that earned second place in the Congressional App Challenge and fourth place at the Annual Entrepreneurs Showcase. Through internships at Carnegie Mellon's RoboTutors and Milgard Windows, Aarav has applied his skills to real-world challenges, with his data analysis work projected to increase production efficiency by 12%. Today, we celebrate Aarav as an exceptional scholar who transforms knowledge into meaningful impact.



**Ria Mahajani**

***Co-Winner – High School Explorer Award***

Ria Mahajani, a junior at Oak Ridge High School, embodies the true spirit of exploration through her ten-year journey in competitive swimming. Beginning at age eight, Ria has pursued excellence with determination and curiosity, achieving impressive personal bests of 27 seconds in the 50-yard backstroke and 1 minute 3 seconds in the 100-yard backstroke. She has competed with three USA club teams across multiple cities, participated in over 25 swim meets, and earned second place in the overall women's backstroke at high school championships. As a team captain and coach, Ria now mentors

others, sharing the lessons she once learned independently. Her journey reflects how exploration leads to both personal achievement and leadership.



**Gargi Jejurikar**
***Co-Winner – High School Explorer Award***

Gargi Jejurikar's six-year journey in cross-country and track is a powerful story of perseverance and self-discovery. Beginning in seventh grade simply to find connection at a

new school, Gargi embarked on a transformative path marked by dedication, resilience, and growth. Through early-morning summer runs, winter training in rain and cold, and weeks reaching thirty miles of running, she consistently pushed her limits. Despite facing mental exhaustion and self-doubt during her junior year, Gargi emerged stronger, surpassing her freshman-year times and achieving long-term goals she had set years earlier. Her story reminds us that exploration is not just about reaching new destinations, but about discovering inner strength along the way. Gargi will continue her journey at **UC Berkeley**, where she will pursue her undergraduate studies.





CHICAGO'S
PIZZA
With-A-Twist

1750 Prairie City Rd #140, Folsom, CA

916-970-9900 | pizzawithatwist.com

# काहीतरी शिजतंय



# विविध प्रकारच्या पुऱ्या

## बीटरूट पुरी (Beetroot Poori)

**साहित्य:** गव्हाचं पीठ, १ बीटरूट ,आले थोडंसं, बडीशेप थोडी ठेचलेली, मीठ, चिमूटभर साखर, तिखट (ऐच्छिक) ,बीटरूटची पाने – बारीक चिरून

**कृती**:

1. बीटरूट अर्धवट उकळून, किसून घ्या
2. अर्धा कप ताजी बीटरूटची पाने घाला.जर देठ वापरत असाल तर आधी थोडी वाफवून घ्या.
3. आले, मीठ, साखर, तिखट आणि बडीशेप पावडर घाला.
4. सर्व एकत्र करून आवश्यक तितकं पीठ घाला.
5. थोडं तेल लावून मळा आणि पुरी लाटून तळा.



पल्लवी सावंत

# टोमॅटो पुरी

**साहित्य:** गव्हाचं पीठ,मीठ, साखर, कढीपत्ता, बारीक लांब चिरून (¼ कप) टोमॅटो, मसाला: ४ टोमॅटो – बारीक वाटून तेल, हिंग, मीठ, साखर, धणे-जिरे पावडर, तिखट टोमॅटो सॉस – १ टेबलस्पून (ऐच्छिक, पण चविष्ट!)

**कृती:**

1. तेल गरम करून हिंग टाका.
2. त्यात वाटलेले टोमॅटो घालून परतून घ्या.
3. त्यात मीठ, साखर, धणे-जिरे पावडर, तिखट आणि सॉस घाला.
4. कच्चा वास गेल्यावर आणि मिश्रण थोडं घट्ट झाल्यावर गॅस बंद करा. साधारण 10 मिनिटे
5. थंड झाल्यावर चव पाहून मसाला ॲडजस्ट करा.
6. आता त्यात बारीक चिरलेला कढीपत्ता आणि पीठ घालून मळा.
7. पुऱ्या लाटून तळा. पर्याय: तयार दक्षिण भारतीय टोमॅटो चटणी वापरूनही ह्या पुरी बनवता येतात. (सुमारे १ कप चटणी वापरा.)



पल्लवी सावंत

# कांदा-लसूण पुरी

**साहित्य:** गव्हाचं किंवा ज्वारीचं पीठ पातीचा, कांदा – १ कप, हिरवा लसूण पात – ¼ कप, तीळ – १ टीस्पून, जिरे – ¼ टीस्पून, ओवा ¼ टीस्पून, मीठ, साखर, हिंग, बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या किंवा खर्डा /ठेचा, दही

**कृती:** 1. सर्व साहित्य एकत्र करून मिसळून घ्या.

2. दही घालून पीठ मळा.

3. पुरी लाटून तळा. टीप: जर ज्वारीचं पीठ वापरत असाल, तर २ टीस्पून तांदळाचं पीठ आणि १ टीस्पून बेसन मिसळा.



पल्लवी सावंत

# लोणच्याची पुरी (Pickle Poori)

**साहित्य:** उरलेलं लोणचं, गव्हाचं पीठ, कसुरी मेथी

**कृती:**

1. जर लोणचं जाडसर असेल, तर मिक्सरमध्ये थोडं फिरवा.
2. त्यात कसुरी मेथी आणि पीठ घालून पुरीचे घट्ट पीठ मळून घ्या.

टीप: घरातलं जुनं किंवा कंटाळा आलेलं लोणचं संपवण्यासाठी ही उत्तम डिश आहे. लोणच्याचं तेलही वापरलं जातं आणि चव अप्रतिम लागते — दह्यासोबत जबरदस्त!



पल्लवी सावंत

# दुधी पुरी

**साहित्य:** किसलेली दुधी (थोडंसं पाणी बाजूला ठेवा) कांद्याची पात (ऐच्छिक) कोथिंबीर, हिंग, मीठ मसाला, धणे-जिरे पावडर १ कप ज्वारीचं किंवा गव्हाचं पीठ ¼ कप थालीपीठ भाजणी किंवा उरलेल चकलीचं पीठ

**कृती:**

1. सगळं साहित्य एकत्र करून मिक्स करा.
2. दुधीचं पाणी वापरून पीठ मळा.
3. पुरी तळा. टीप: जर ज्वारीचं पीठ वापरत असाल, तर २ टीस्पून तांदळाचं पीठ आणि १ टीस्पून बेसन मिसळा. पुरींसाठी पीठ घट्ट मळा.

तळायचे नसल्यास: वरील सर्व रेसिपींचं पीठ जरा चपाती सारखे मऊ मळा. मग ह्या मऊ पिठातून थेपले, पराठे सुद्धा बनवता येतात



पल्लवी सावंत

tabla niketan®

# Website and Digital Media Sponsor

DIGITAL FACTORY 24

# मराठी शाळा सॅक्रामेंटो

**Marathi Shala, Sacramento — A Cultural & Language Initiative"**

## मराठी शाळा, सॅक्रामेंटो – भाषा आणि संस्कृती जपणारी उपक्रमशील संस्था

मराठी शाळा सॅक्रामेंटो (Marathi Shala Sacramento) हा मराठी मंडळ सॅक्रामेंटो (MMSAC) या संस्थेअंतर्गत जपणारा शैक्षणिक उपक्रम आहे.
या शाळेचा उद्देश अमेरिकेतील सॅक्रामेंटो परिसरातील मराठी परिवारांतील मुलांना मराठी भाषा वाचता, लिहिता आणि बोलता येणे, तसेच मराठी संस्कृतीबद्दल प्रेम व अभिमान निर्माण करणे हा आहे.
शाळा बृहन्महाराष्ट्र मंडळ (BMM) या छत्रसंस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या मराठी शाळांच्या जाळ्याचा एक भाग आहे.

सॅक्रामेंटो परिसरातील वेगवेगळ्या भागातील कुटुंबांना सोयीचे होण्यासाठी मराठी शाळेचे शाळा साध्या ह्या वर्षी पालकाच्या आग्रहोत्सव, संयुक्त (hybrid) तत्त्वावर सुरू केली.

फॉल्सम मध्ये दर शुक्रवारी सायंकाळी शाळेचे वर्ग घेतले जातात.

मराठी शाळा ही केवळ भाषा शिकवणारी संस्था नाही, तर ती एक सांस्कृतिक केंद्र आहे.

शालेय विद्यार्थी, गणेशोत्सव, दिवाळी, सामूहिक गायन, नाटिका, कविता वाचन अशा उपक्रमांत भाग घेतात. तसेच, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा मध्ये सुद्धा शाळेची मुलं उत्साहाने सहभागी होतात.
बोलणे, वाचन, लेखन या सर्व बाबींमध्ये समतोल ठेवणे आव्हानात्मक ठरते.
या डिसेंबर मध्ये आपण "अभंग तुकाराम " हा मराठी चित्रपट इथे शाळेच्या मुलांसाठी दाखविला.
BMM तर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी ह्या चित्रपटाचे आयोजन केले होते.
सॅक्रामेंटोमधील मराठी कुटुंबांमध्ये आपुलकी वाढते, आणि नवीन पालकांनाही समुदायाशी जोडले जाते.
ऑनलाइन आणि हायब्रिड पद्धतीने शिक्षण देण्याच्या संधी वाढल्या आहेत.

इथे वाढणाऱ्या मुलांमध्ये मराठी भाषेचे प्रेम आणि अभिमान जागवणे आवश्यक आहे.
मराठी भाषा शिकणे, मुलांमध्ये आत्मविश्वास वाढवते, त्यांना आपल्या संस्कृतीशी जोडते, आणि मराठी ओळख टिकवून ठेवते. ह्या साठी आपल्या मुलांना आपली भाषा उत्तम येणे आवश्यक आहे.

**शिक्षक व स्वयंसेवक:** शाळा पूर्णतः स्वयंसेवकांच्या माध्यमातून चालवली जाते. आपल्यापैकी कुणाला शाळेत volunteering करायचे असेल तर आम्हाला जरूर संपर्क साधावा.

मराठी शाळा सॅक्रामेंटो समिती
mmsac.shala@gmail.com

**रुजवू मराठी, फुलवू मराठी, चला मुलांनो शिकू मराठी!**



# मराठी शाळा कार्यक्रमांची काही क्षणचित्रे












Delicious!
BAKERY - CHARTS - DOSA - SNACKS - SHAKES
FRESH & DELICIOUS
BAKERY BITES
CAKES & CHAAT
WE DO ALL TYPES OF CATERING SERVICES
OPEN ALL 7 DAYS | 10:00 AM TO 9:00 PM
Fresh. Tasty. Irresistible...!
Folsom
916 467 7243
299 Iron point rd,
Folsom, CA95630
Roseville
916 771 7014
10050 Fairway Dr #120,
Roseville, CA 95678

# MMSac Youth Outreach Program




MMSac Mentorship Program
MMSac mentors will play a **key, guiding role** in professional development of our youth.
Volunteer 4 hours per year to mentor MMSac youth.
Share your area of expertise and experience.
Specify the type of youth you wish to mentor:
High school students
College students
Early-career professionals
Together, let's build a stronger future for our community.
**Mentor's Roles:**
1. Guidance and Career Advice
2. Recommend resources
3. Networking Support


Internship and Job Opportunities
We are appealing to all MMSac members to get involved and help our youth by sharing the opportunities they are aware of.
Share job postings from your company or organizations you are associated with.
Submit the request for posting on the MMSac website.
Let us know if applicants can use your name as a reference.
Clearly identify the opportunity type:
Summer Internship
Entry-level job for college graduates
Position for experienced professionals

# MMSac Volunteering

**We encourage youth to volunteer for MMSac. We will recognize their effort and provide them a certificate of appreciation at the end of the year. Here are a few benefits for volunteering**

- **Build Real-World Skills**
  Volunteering helps youth develop leadership, teamwork, communication, and problem-solving — skills that employers and colleges truly value.
- **Explore Interests and Careers**
  By volunteering, young people can discover what they enjoy (and what they don't), which helps guide their education and career choices.
- **Strengthen College & Job Applications**
  Community service shows initiative, compassion, and commitment — traits that stand out on college essays, resumes, and scholarship applications.
- **Connect with Mentors & Networks**
  Volunteering opens doors to meet professionals and mentors who can offer valuable advice, opportunities, and encouragement.
- **Give Back to the Community**
  It fosters empathy and gratitude by making youth aware of real-world challenges — you can make a difference. and create leaders to lead our community programs in the future.
- **Build Confidence & Purpose**
  When youth see the positive impact they can create, it boosts self-esteem, optimism, and a sense of belonging.
- **Preserve and Promote Marathi and Indian Culture**
  For MMSac youth, volunteering keeps Marathi culture vibrant and relevant — passing on traditions while engaging with the wider community.


Appeal to MMSac Members
Get involved and get your kids involved
Sign up as a mentor
Nurture our kids and enrich our community
Sponsor a MMSAC scholarship/award



# धन्यवाद

# मराठी मंडळ सॅक्रामेंटो